SAKAL NEWSPAPER 25 APRIL 2015




करून पाहूया

# आंब्याच्या कोयीपासून प्राणी

मित्रांनो, आता आंब्याचा सीझन सुरू झाला आहे. भरपूर आंबे खाऊन तुम्ही साली, कोयी फेकून देत असाल ना? आता आंब्याच्या कोयी फेकून न देता त्या नीट खाऊन स्वच्छ धुऊन घ्या. कोय थोडी वाळल्यावर त्यापासून छायाचित्रात दिसतोय, तसा एक प्राणी तुम्ही बनवू शकता. यासाठी लागणारे साहित्य म्हणजे आंब्याची एक कोय, काडेपेटीतील चार काड्या, लोकरीचा दोरा, जाड सुई. हा प्राणी बनवताना प्रथम कोयीला जाड सुईने एकूण सहा छिद्रे पाडून घ्या. यातील चार छिद्रे पायांसाठी आणि वरील दोन छिद्रांपैकी एक डोळ्यासाठी आणि एक शेपटीसाठी करून घ्या. त्यानंतर खालील चार छिद्रांमध्ये काड्यापेटीच्या काड्या घट्ट खोचून घ्या. यानंतर शेपूट करण्यासाठी पाठीच्या मागे केलेल्या एका छिद्रातून लोकरीचा दोरा ओवून त्याला एक गाठ मारून घ्या. या प्राण्याच्या डोळ्यांच्या खाचा आधीच तुम्ही केलेल्या असल्याने त्याला वेगळा कृत्रिम डोळा लावण्याची गरज नाही. आंब्याच्या कोयीपासून प्राणी तय्यार...

